**MHKO100003292022**

## आदेश निशाणी क्र. १०

प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज त्यांचे विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होवून कैफीयत दाखल करणेस परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी यांचा अर्ज व वादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांनी त्यांचे अर्जातील व म्हणण्यातील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला आहे.

३. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी यांनी कैफीयत देणेस जाणुनबुजून टाळाटाळ केलेली नाही. वादी यांनी प्रतिवादी यांना रा. इंदिरानगर, चिंबेल जुना गोवा जिल्हा नॉर्थ गोवा या पत्त्यावर रजिस्टर पोष्टाने समन्स पाठविले होते. मात्र प्रतिवादी ही दिनांक १ मार्च २०२२ पासून घर नं. २८६ संतान व्हीला मोलाका मरसेस तिसवाडी, गोवा या पत्त्यावर राहत असते. सदर पत्त्यावर प्रतिवादी यांना कधीही दाव्याचे समन्स आलेले नाही. वादी यांनी जाणुनबुजून पूर्वीच्या पत्त्यावर दाव्याचे समन्स पाठविले होते. त्यामुळे ते घेत नाही या कारणाने परत आले आहे व प्रतिवादी विरुध्द एकतर्फी आदेश झालेला आहे. प्रतिवादी यांचे विरुध्द झालेला एकतर्फाचा आदेश रद्द करुन प्रतिवादी यांची कैफीयत दाखल करुन घेतल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रस्तुतचा दावा गुणदोषावर चालून न्यायनिर्णित होणे न्यायाचे दृष्टीने अत्यंत योग्य व आवश्यक असलेने सदर कामी झालेला एकतर्फा चा आदेश रद्द होणे आवश्यक आहे. सबब प्रतिवादी यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. वादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादी यांचे अर्जातील मजकुर धांदात खोटा व लबाडीचा आहे. सदरकामी दिनांक २६/०४/२०२२ रोजी एकतर्फा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. अर्जातील कारण संयुक्तीक नाही. सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा व मंजूर करावयाचा झालेस प्रतिवादी हिचेवर कॉस्ट बसविणेत यावी अशी विनंती केली आहे.

५. वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द प्रतिवादी हिने वादीकडे नांदणेस येणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. त्यामुळे प्रतिवादी यांचे कथनावर अविश्वास दाखविण्यासारखी परिस्थिती अभिलेखावर नाही. दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रतिवादी यांचे विरुध्द झालेला एकतर्फा चौकशी आदेश रद्द होणे आवश्यक आहे. वादी यांनी प्रतिवादी यांना सदर दाव्याचे समन्स हे रा. इंदिरानगर, चिंबेल जुना गोवा जिल्हा नॉर्थ गोवा ४०३ ००६ या पत्त्यावर नोंदणीकृत

डाकणे पाठविल्याचे दिसते. परंतु प्रतिवादी यांनी आपल्या अर्जामध्ये प्रतिवादी ही दिनांक ०१ मार्च २०२२ पासून घर नं. २८६ संतान व्हीला मोलाका मरसेस तिसवाडी, गोवा या पत्त्यावर राहत असलेबाबत शपथेवर कथन केले आहे. त्यामुळे प्रतिवादी ही वादी यांनी समन्स पाठविलेल्या पत्त्यावर राहत नसलेचे दिसून येते. वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द नांदविणेस येणेसाठी दाखल केलेला असलेने सदरची बाब ही प्रतिवादी यांना माहीत असलेने गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादी यांच्या विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होवून अर्जासोबत जोडलेली प्रतिवादी यांची कैफीयत अभिलेखावर दाखल करुन घेणे गरजेचे आहे. प्रतिवादी यांची कैफीयत अभिलेखावर घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे.

**६.** उभय पक्षांचे कथन पाहता या ठिकाणी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे (नागपूर बेंच) मधील ***Municipal Council, Hinganghat, Dist. Wardha V/s. Sudhirkumar Krushnakumar Sahani reported in 2010(3) Mah. L.J. Page No. 948 Bom. H.C. (Nagpur Bench)*** या न्यायनिर्णयाचा आधार घेत आहे. सदर न्यायनिर्णयामध्ये "*Outer after limit for filing written statement is 90 days from the date of service of summons but where sufficient ground and reasons are shown the application though filed belatedly and casually, deserves to be allowed.*" असे अभिमत व्यक्त करण्यात आलेले आहे. प्रतिवादी यांनी आपली कैफीयत दाखल करणेस उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी केलेल्या उशीराबाबत त्यांचेवर खर्च बसवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

**१)** प्रतिवादी यांचा निशाणी क्र. १० वरील अर्ज वादी यांना खर्चादाखल रक्कम रुपये २००/- (अक्षरी रुपये दोनशे मात्र) देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

**२)** प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी यांची प्रस्तुत अर्जासोबत दिलेली कैफीयत अभिलेखावर दाखल करुन घेणेत यावी.
(खुल्या न्यायालयात न्यायनिर्णय घोषित करण्यात आला)

Digitally signed by Maheshkumar Tanajirao Kharade
Date: 2022.08.20 15:55:56 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक १७/०८/२०२२

(म. ता. खराडे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज